संक्षिप्त फौज. खटला क्र. १५५/२०२४
शासन वि. किसकिंदा

## निशाणी क्र. १ खालील आदेश

विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.टी. वैद्य यांनी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्याची विनंती केली. प्रस्तुत प्रकरण सन २०२४ सालचे असुन, आरोपीविरुध्द निशाणी ०९ अन्वये दिनांक ३१/१०/२०२५ रोजी दोषारोप निश्चित केला आहे. तेव्हापासुन अद्यापपावेतो अभियोग पक्षातर्फे केवळ दोन साक्षीदारास हजर ठेवून पुरावा देण्यात आलेला आहे. अभियोग पक्षाच्या साक्षीदारांस वारंवार समन्स पाठवून देखील अभियोग पक्ष साक्षीदारांना उपस्थित ठेवुन पुरावा सादर करण्यास असमर्थ ठरला आहे. तसेच तपासण्यात आलेल्या पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास पुरक असा पुरावा दिला नाही. अभिलेखावर रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत प्रकरण पुढे चालू ठेवण्यात कोणतेही स्वारस्य दिसुन येत नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करणे योग्य आहे. सबब, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात येतो.

तसेच प्रकरणातील साक्षीदाराने दिलेला पुरावा पाहता सदर साक्षीदाराने आरोपीविरुध्द काहीही पुरावा दिला नसल्याचे दिसते. त्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन वगळण्यात येते.

सही/-
(अमृता डी. जाधव)
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग.,
(कोर्ट क्र. ३), कळंब.

दिनांक - २३/०७/२०२६
ठिकाण - कळंब